WANotify.org

# WA NOTIFY कसे काम करते

WA Notify (ज्याला वॉशिंग्टन एक्स्पोजर अधिसूचना म्हणून देखील ओळखले जाते) हे कोविड-19 चा प्रसार थांबवण्यास मदत करण्यास महत्त्वाचे टूल आहे. जसे की फक्त मास्क परिधान करणे. सुरक्षित अंतर ठेवणे आणि लसीकरण करुन घेणे आहे, त्याप्रमाणे आपल्या समाजाचे संरक्षण करण्यास WA Notify हा एक चांगला मार्ग आहे.

WA Notify हे जर वापरकर्ते हे कोविड-19 ला एक्स्पोज झालेले असू शकतात याचा इशारा देण्यासाठी, कोणतीही व्यक्तिगत माहिती शेअर न करता, स्मार्टफोनमधून काम करते. **ते पूर्णपणे खाजगी आहे, आणि तुम्ही कोण आहात किंवा तुम्ही कोठे जात आहात याचा मागोवा घेत नाही.**

अभ्यासामध्ये असे दिसून आले आहे की जेवढ्या अधिक लोकांनी एक्स्पोजर अधिसूचना तंत्रज्ञानाचा वापर केला आहे, त्यांना अधिक फायदा झाला आहे. वॉशिंग्टन राज्यातील मॉडेलनी असे दाखविवे आहे की अगदी लहान प्रमाणातील लोकांनी जरी WA Notify चा वापर केला तरी संसर्गाला आणि मृत्युना कमी करेल.

## तुमच्या फोनमध्ये WA NOTIFY जोडा

**iPhone वर:**

१. Settings (सेटिंग्ज) वर जावा
२. Exposure Notifications (एक्स्पोझर अधिसूचना) कडे स्क्रोल डाउन करा
३. “Turn On Exposure Notifications (एक्स्पोझर अधिसूचना सुरू करा)” वर क्लिक करा
४. युनायटेड स्टेट्स निवडा
५. वॉशिंग्टन निवडा

**Android फोन वर:**

१. Google Play Store (Google प्ले स्टोअर) वर जावा
२. WA Notify ॲप डाउनलोड करा

## एकदा का तुम्ही तुमच्या फोनमध्ये WA NOTIFY जोडले

ते कोविड-19 च्या प्रसाराला रोखण्यास मदत करण्यास कसे काम करते ते येथे आहे

**१**



जेव्हा दोन व्यक्ती त्यांच्या स्मार्टफोनवर WA Notify वापरत असतील, त्यांचे फोन ब्ल्यूटूथचा वापर करून रॅन्डम कोडस् ना एक्सचेंज करतील. **कोड्स हे, कोणत्याही स्थान मागोवा घेणे किंवा व्यक्तिगत माहितीच्या एक्सचेंज शिवाय, पूर्णपणे अनामिक आहेत.**

**२**




जर कोणीही प्रयोगशाळेत करण्यात आलेल्या चाचणी मार्फत कोविड-19 च्या चाचणीला पॉझिटिव्ह आल्यास, सार्वजनिक आरोग्य त्यांना एक पडताळणी लिंक असलेला टेक्स्ट संदेश आणि/किंवा एक पॉप-अप होणारी अधिसूचना पाठवेल. वैकल्पिकररित्या, वापरकर्ता घरी करण्यात आलेल्या चाचणीच्या पॉझिटिव्ह निकालासाठी एक पडताळणी कोड ची विनंती करु शकतो.

**३**



ॲप मध्ये त्यांच्या निकालाची पुष्टी करण्यासाठी व्यक्ती ज्याची चाचणी पॉझिटिव्ह आलेली आहे तो **लिंक ला क्लिक करेल** किंवा अधिसूचनेला टॅप करेल आणि **पाऊलांचे अनुसरण करेल.**

**४**



WA Notify वापरकर्त्यांना अधिसूचना प्राप्त होईल की कोविड-19 साठीच्या चाचणीमध्ये अलिकडेच पॉझिटिव्ह आलेल्या **अनामिक WA Notify वापरकर्त्या च्या ते जर जवळपास** आणि संभाव्यपणे एक्स्पोज झालेले असतील तर ते कोविड-19 एक्स्पोज झालेले असू शकतात.

**५**




अधिसूचनेमध्ये तुम्हाला स्वतःला आणि इतरांना संरक्षित करण्यास पुढेकाय करावे याबद्दल माहिती असलेली एक लिंक असेल. **त्यामध्ये कोणाची चाचणी पॉझिटिव्ह आली किंवा एक्स्पोजर कोठे घडून आलेले असू शकते अशी कोणतीही माहिती नसेल.**